**-: प्रेस नोट :-**

कक्ष ११, गु.प्र.शा., गु.अ.वि., कांदिवली-प, मुंबई दिनांक:- २८/०५/२०२२

**कुरीअर बॉय असल्याचे सांगून जेष्ठ नागरिक महिलेच्या घरात घुसून तिचे हात-पाय बांधून व तोंड दाबून जबरी चोरी केल्याचा गुन्हा उघडकिस आणलेबाबत.....**

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष - ११, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.विभाग, कांदिवली पश्चिम, मुंबई. |
| पोलीस ठाणे | मालाड पोलीस ठाणे, मुंबई |
| गु.नों.क्र. व कलम | मालाड पोलीस ठाणे, गु.नों.क्र. ५८६/२०२२, कलम ३९४,४५२,५०४, १२०(ब), ३४ भादंवि सह ३७(१)(a),१३५ म.पो.अ.१९५१. |
| दाखल दिनांक | दिनांक ०७/०५/२०२२ रोजी १७.०० वा |
| गुन्हा घडला दिनांक, वेळ व ठिकाण | दिनांक ०७/०५/२०२२ रोजी १४.३० ते १४.४५ वा. चे दरम्यान<br>ठिकाण- ए ६, मारुती अपार्टमेंट, अल्काविहार, एस.व्ही.रोड, मालाड प. मुंबई. |
| फिर्यादीचे नाव | जेष्ठ महिला नागरिक, वय ७२ वर्षे. |
| अटक आरोपींची संख्या | ०४ पुरुष<br>१.आरोपी २८ वर्षे<br>२.आरोपी १८ वर्षे<br>३.आरोपी ६० वर्षे<br>४.आरोपी २७ वर्षे |
| थोडक्यात प्रेस नोट | दिनांक ०७/०५/२०२२ रोजी दुपारी १४.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी यांचे वर नमूद घराची बेल वाजवून कुरिअर बॉय असल्याचे सांगून फिर्यादी यांनी घराचा दरवाजा उघडला असता ३ अनोळखी इसमाने जबरदस्तीने घरात घुसून फिर्यादी यांचे हात पाय बांधून व तोंड दाबून तिच्या घरातील सोन्याचे दागिणे व रोख रक्कम अशी एकूण १,८७,५०० /- रू. मालमत्ता जबरदस्तीने चोरी केली व तेथून पळून गेले. सदरबाबत फिर्यादी यांचे तक्रारीवरून मालाड पोलीस ठाणे येथे वरील गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हयातील फिर्यादी हया जेष्ठ नागरिक महिला असल्याने गुन्हयास गंभिर स्वरूप प्राप्त झाले होते.<br>गुन्हा दाखल झाल्यानंतर तात्काळ गु.प्र.शा., कक्ष- ११ चे पथक गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून माहिती प्राप्त करण्यात आली. त्या अनुषंगाने खबऱ्यांना कार्यरत करण्यात आले. पारंपारीक पध्दतीने मानवी कौशल्याचा वापर केला तसेच, सी.सी.टी.फुटेज आणि आधुनिक पध्दतीने तांत्रिक माहिती गोळा करण्यात आली होती. मानवी कौशल्य व तांत्रिक माहितीचा योग्य समन्वय साधून त्या माहितीच्या आधारे वरील गुन्हयातील आरोपी हे जिल्हा सिध्दार्थ नगर परिसर, उत्तर प्रदेश येथे असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. त्यानुसार मा.वरिष्ठांची पूर्व परवानगी प्राप्त करून **प्रपोनि विनायक चव्हाण** यांचे पर्यवेक्षणाखाली **पो.नि. भरत घोणे, स.पो.नि. अभिजीत जाधव, पो.ना. ००.७८५/केणी, पो.ना.०३.३६०/खताते, पो.ना.०३.३५२/कदम व पो.ना. ०६.०६०६/शिंदे** असे पथक हे जिल्हा सिध्दार्थ नगर परिसर, उत्तर प्रदेश येथे जावून, गोरखपूर, उत्तर प्रदेश येथील टास्क फोर्स मधील पो.ह.श्रीवास्तव, पो. ह.उमेश सिंह, पो.ह.अशोक सिंह व पो.शि.गोरव सिंह यांच्या मदतीने जामुनी |

| | |
|---|---|
| | आणि परसिया गांव, शोहरतगढ, सिध्दार्थ नगर, उत्तर प्रदेश येथे चार दिवस पाळत ठेवून आरोपी हे नेपाळ देशात पळून जाण्याच्या तयारीत असताना ३ आरोपींना दि.२७/०५/२०२२ रोजी शिताफिने ताब्यात घेतले. त्यांचेकडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम अशी मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. त्यांचेकडे केलेल्या तपासामध्ये दुसरा आरोपी हा ललिता गारमेंट्स, भांडुप पश्चिम, मुंबई येथे असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने तात्काळ कक्ष ११ चे पोउपनि अजित कानगुडे, पोह तरटे व पोह सुर्वे यांनी साफळा लावून त्यास ताब्यात घेतले व त्याच्याकडूनही गुन्हयातील सोन्याचे दागिणे व रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.<br><br>नमूद आरोपीतांना मा.न्यायालयात हजर करून ट्रांझीस्ट रिमांड घेवून आज रोजी कक्ष कार्यालय येथे आणले असून त्यांना दि.२९/०५/२०२२ मा. न्यायालयात रिमांड करीता हजर करणार आहोत.<br><br>सदरची यशस्वी कामगिरी मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री.सुहास वारके, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.एस. विरेश प्रभू, मा.पोलीस उप-आयुक्त(प्र-१) श्री.सग्रामसिंह निशाणदार, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-उत्तर) श्री. काशिनाथ चव्हाण यांच्या मागदर्शनाखाली व **प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. विनायक चव्हाण** यांच्या पर्यवेक्षणाखाली **पो.नि. भरत घोणे, स.पो.नि. अभिजीत जाधव, पोउपनि अजित कानगुडे, पो.ह. २९२१०/तरटे, पो.ह.३४३८३/ सुर्वे, पो.ना.००.७८५/केणी, पो.ना.०३. ३६०/खताते, पो.ना.०३.३५२/कदम पो.ना.०६.०६०६/शिंदे** यांनी केली आहे.<br><br>*****D-1/ 16 /2022***** |